# भारत फोर्ज ग्रामीण भारताचा वैद्यकीय दीपस्तंभ

## टेलिमेडिसिन सुविधांचा ग्रामस्थांनी घेतला लाभ

पुणे, (वा.) आरोग्यसंपन्न भारताच्या निर्माणासाठी भारत फोर्जने सुरू केलेल्या टेलिमेडिसिन सुविधांचा लाभ आजवर येथील तब्बल १६,८६६ ग्रामस्थांनी घेतला असून दर्जेदार आरोग्य सुविधांवर आपलाही अधिकार आहे.भारत फोर्ज ग्रामीण भारताचा वैद्यकीय दीपस्तंभ आहे. भारत फोर्जचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब कल्याणी यांची मूळ कौटुंबिक पार्श्वभूमी खेड्यातील असल्याने ग्रामीण भागांतील विविध समस्यांविषयी त्यांना जाण आहे व त्या सोडवण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेतात. महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने सीएसआर प्रकल्पांतर्गत भारत फोर्जने निवडक १०० गावांतील सोयी सुविधांकडे विशेष लक्ष देण्याचे ठरवले. पाणी, शिक्षण, पायाभूत सुविधा, आरोग्य आणि रोजगार यांबाबत ही गावे स्वयंपूर्ण होण्यासाठी गावकरी आणि भारत फोर्ज एकजुटीने प्रयत्नशील आहेत आणि त्यातून गावाचा कायापालट होत आहे. महाराष्ट्रातील अनेक दुर्गम गावे, वाड्या व वस्त्यांमध्ये, जिथे मूलभूत सुविधा मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो, तिथे आरोग्य सुविधा मिळणे तर दुरापास्तच! बहुतांश गावांतील स्त्री-पुरुष शेतमजूर म्हणून रोजंदारीवर काम करतात.